ePaper


**“29 एप्रिलनंतर देशात पेट्रोल-डिझेल महाग होण्याची शक्यता”; राहुल गांधी**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 29 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 6 वरुन...

गुजरातमध्ये BJPचा डंका!

### पर्यावरणीय धोक्यामुळे सरकार कठोर भूमिकेत, तर अंबानींचा मानवतावादी पर्याय


# 'ते' 80 हिप्पो वनतारामध्ये पाठवा..!' उद्योजक अनंत अंबानी यांची कोलंबीया सरकारला विनंती

**महाईन्यूज । मुंबई**

उद्योगपती अनंत अंबानी यांचे प्राणीप्रेम पुन्हा एकदा समोर आले आहे. दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात वाढत्या हिप्पोंच्या (पाणघोडे) संख्येमुळे निर्माण झालेल्या समस्येवर सरकारने कठोर पाऊल उचलत ८० हिप्पोंना ठार करण्यास परवानगी दिली आहे. मात्र, या निर्णयावर अनंत यांनी मानवतावादी पर्याय सुचवला असून, त्या हिप्पोंना 'वनतारा'मध्ये पाठवण्याची विनंती केली आहे.

## हिप्पोंच्या वाढत्या संख्येने पर्यावरणाला धोका

कोलंबियातील मॅग्डालेना नदी खोऱ्यात हिप्पोंची संख्या झपाट्याने वाढत आहे. या भागात सध्या सुमारे २०० हिप्पोंचे वास्तव्य आहे. या भागात नैसर्गिक भक्षक नसल्याने हिप्पोंची संख्या नियंत्रणाबाहेर गेली असून, यामुळे स्थानिक जैवविविधता आणि मानवी सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. यामुळेच आता सरकारने सुमारे ८० हिप्पोंना मारण्याचा निर्णय घेतला आहे.





## वनताराची तयारी पूर्ण

‘वनतारा’ने या मोहिमेसाठी सविस्तर योजना तयार केली आहे. अनुभवी पशुवैद्यकीय टीम, सुरक्षित वाहतूक व्यवस्था, बायो-सिक्युरिटी प्रोटोकॉल आणि प्राण्यांसाठी अनुकूल अधिवास.

तसेच, अंतिम निर्णय होईपर्यंत हिप्पोंना ठार मारण्याची प्रक्रिया थांबवण्याची विनंतीही करण्यात आली आहे. हा प्रस्ताव मान्य झाला, तर वन्यजीव संरक्षणासाठी एक नवे उदाहरण निर्माण होईल.



## ‘वनतारा’मध्ये पुनर्वसनाचा प्रस्ताव

दरम्यान, अनंत अंबानी यांनी या निर्णयाबाबत चिंता व्यक्त करत कोलंबिया सरकारला पर्यायी उपाय सुचवला आहे. अनंत यांनी कोलंबिया सरकारला प्रस्ताव दिला आहे की, या हिप्पोंना सुरक्षित आणि वैज्ञानिक पद्धतीने भारतात आणून त्यांचे ‘वनतारा’मध्ये पुनर्वसन करावे. नैसर्गिक अधिवास, तज्ज्ञांकडून वैद्यकीय देखभाल आणि दीर्घकालीन संरक्षण यामुळे या प्राण्यांचा जीव वाचेल.

## कोलंबिया सरकारला पत्र...

अंबानी यांनी कोलंबियाच्या पर्यावरण मंत्री IRENE VÉLEZ TORRES यांना पत्र लिहून या योजनेचा विचार करण्याची विनंती केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, संपूर्ण प्रक्रिया अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली होईल आणि भारत व आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन केले जाईल.

## ‘वनतारा’मध्ये पुनर्वसनाचा प्रस्ताव

दरम्यान, अनंत अंबानी यांनी या निर्णयाबाबत चिंता व्यक्त करत कोलंबिया सरकारला पर्यायी उपाय सुचवला आहे. अनंत यांनी कोलंबिया सरकारला प्रस्ताव दिला आहे की, या हिप्पोंना सुरक्षित आणि वैज्ञानिक पद्धतीने भारतात आणून त्यांचे ‘वनतारा’मध्ये पुनर्वसन करावे. नैसर्गिक अधिवास, तज्ज्ञांकडून वैद्यकीय देखभाल आणि दीर्घकालीन संरक्षण यामुळे या प्राण्यांचा जीव वाचेल.



# सीआयडी तपासावर रोहित पवार नाराज

## सरकार आणि तपास यंत्रणा हे प्रकरण गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून आले

**महाईन्यूज । पुणे**

**‘राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात तीन महिन्यांपूर्वी मृत्यू झाला. सरकार आणि तपास यंत्रणा हे प्रकरण गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून आले आहे’, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी नाराजी व्यक्त केली.**



अजित पवार विमान अपघात प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपविण्यात आला आहे. यापार्श्वभूमीवर रोहित पवार हे तपासाचा आढावा घेण्यासाठी सीआयडी कार्यालयात आले. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वरिष्ठ अधिकारी कार्यालायात उपस्थित नसल्याचे दिसून आल्याने पवार यांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, ‘एकंदरच सरकार आणि तपास यंत्रणा अजित पवार विमान अपघात प्रकरणाला गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून आले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे खुर्चीचे छायाचित्रे काढले. पुढील वेळेश भेटीस आल्यानंतर मला सीआयडी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेरील पोलिस कर्मचाऱ्यांशी संवाद साधावा लागेल. मी तिसऱ्यांदा सीआयडी कार्यालयात गेलो. मात्र, एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हते.’

अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्याच दिवशी विमान कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांच्या कात्यात नऊ कोटी ८१ रुपये हस्तांतरित करण्यात आले. अंत्यविधीच्या दिवशी सिंग यांच्या खात्यात १६ कोटी ८८ लाख रुपये हस्तांतरित करण्यात आले. आतापर्यंत व्ही. एस. आर. विमान कंपनीच्या खात्यात तब्बल १४५ कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आले’ असा आरोप रोहित पवार यांनी केला.

### काटेवाडी, देवगिरी बंगल्याबाहेर अघोरी पूजा

‘आम्ही काळी जादू, भोंदुगिरीवर विश्वास ठेवत नाही. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूपूर्वी काटेवाडीतील निवासस्थानाच्या परिसरात, मुंबईतील देवगिरी बंगल्याच्या परिसरात अघोरी पूजा करण्यात आल्या होत्या. या कृत्यामागचे उद्देश काय आहे. हा सर्व प्रकार राजकीय षडयंत्राचा भाग आहे’, असा आरोप रोहित पवार यांनी केला. अघोरी पूजा प्रकरण, तसेच अशोक खरात प्रकरणाचा सखोल तपास होणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.



# 1 मेपासून मिसिंग लिंकमुळे मुंबई- पुणे प्रवास होणार अगदी सुस्साट

**महाईन्यूज । पुणे**

**सध्याचा मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे आणि जुना मुंबई-पुणे महामार्ग हे दोन्ही मार्ग खालापूर ते लोणावळा (अडोशी ते खंडाळा) या १० किलोमीटरच्या घाट क्षेत्रात एकमेकांना मिळतात. यामुळे या भागात प्रचंड वाहतूक कोंडी होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी जो नवीन जोडमार्ग तयार केला, त्याला 'मिसिंग लिंक' असे नाव पडले. मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प केवळ रस्ता नसून तो जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकीचा नमुना ठरला आहे. या मार्गावरील जगातील सर्वात रुंद ८ पदरी बोगद्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये होण्याचा दावा एमएसआरडीसीने केला आहे.**



या प्रकल्पातील ८.९२ किमी लांबीचा बोगदा हा २३.७५ मीटर रुंद आहे. हा जगातील सर्वात रुंद ८-पदरी (8-lane) बोगदा असल्याचा दावा केला जात असून, याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये होण्याची शक्यता आहे.भारतातील सर्वात उंच केबल-स्टेड पूल: टायगर व्हॅलीवर बांधलेल्या पुलाचे खांब १८२ मीटर उंच आहेत. याची तुलना करायची झाल्यास, वांद्रे-वरळी सी-लिंकच्या खांबांची उंची १२६ मीटर आहे, म्हणजेच हा पूल त्यापेक्षाही ५६ मीटरने उंच आहे.

या प्रकल्पाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे बोगद्याचा काही भाग लोणावळा तलावाच्या तळापासून साधारण १८० मीटर खोल जमिनीखालून जातो.तो अत्याधूनिक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन बांधण्यात आला आहे.

या प्रकल्पाचा खर्च तांत्रिक आव्हाने आणि विलंबामुळे मूळ खर्च वाढून तो आता ₹७,५०० कोटींच्या घरात गेल्याचे सांगण्यात येते. तसेच या प्रकल्पाच्या कामाला साधारणपणे २०१९ मध्ये सुरुवात झाली होती. सध्या एप्रिल २०२६ अखेरपर्यंत या प्रकल्पाचे ९९% काम पूर्ण झाले असून अंतर्गत सजावट आणि रंगरंगोटी सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारण ६ वर्षांचा कालावधी लागला आहे.

हा प्रकल्प MSRDC (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) मार्फत राबविला जात आहे. यातील महत्त्वाच्या पुलाचे आणि टनेलचे काम मुख्यत्वे ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर (Afcons Infrastructure) आणि नवयुगा इंजिनीअरिंग (Navayuga Engineering) यांसारख्या कंपन्यांनी केले आहे.

### जड वाहनांना बंदी

सुरुवातीच्या सहा महिन्यांसाठी या मार्गावरून केवळ कार आणि बस सारख्या प्रवासी हलक्या वाहनांना प्रवेश दिला जाईल. अवजड ट्रॅकला सध्याच्या जुन्या घाटातूनच जावे लागेल. या नवीन मार्गासाठी प्रवाशांकडून कोणताही अतिरिक्त टोल आकारला जाणार नाही. खालापूर किंवा उर्से टोल नाक्यावर सध्या असलेला टोलच कायम राहील. तसेच खंडाळा घाटातील 'अडोशी' आणि 'अमृतांजन पॉईंट' यांसारखी अपघातप्रवण वळणे टळणार असल्याने अपघातांचे प्रमाण जवळपास शून्यावर येईल.

# रमाईंचा त्यागच बाबासाहेबांच्या कार्यामागची खरी शक्ती; केंद्रीय मंत्री रामदास आठवले...

## ऐतिहासिक क्षण : त्यागमूर्ती रमाई आंबेडकर सृष्टीचे पिंपरीत भूमिपूजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या कार्यामागे त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांचा त्याग, समर्पण आणि खंबीर साथ हीच खरी ताकद होती, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पिंपरी येथे केले.**







पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) परिसरात उभारण्यात येणाऱ्या "त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी"चे भूमिपूजन त्यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी बाबासाहेबांचे नातू डॉ. भीमराव आंबेडकर, महापौर रवि लांडगे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आठवले यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी देशाला संविधान, समानता आणि स्वाभिमान दिला; मात्र त्या कार्याला बळ देणारी शांत, त्यागी शक्ती रमाईंच्या रूपाने त्यांच्या पाठीशी उभी होती. "रमाई नसत्या तर बाबासाहेबांचे महान कार्य अधिक कठीण झाले असते," असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाचा उल्लेख करत शिक्षण, न्याय आणि मानवतेसाठी त्यांनी केलेल्या कार्याला आदरांजली वाहिली.

डॉ. भीमराव आंबेडकर यांनी या प्रकल्पाचे भूमिपूजन हे पिंपरीसाठी गौरवाची बाब असल्याचे सांगत शहरात भीमसृष्टीसह महापुरुषांची उभारलेली स्मारके सामाजिक परिवर्तनाचा वारसा जपत असल्याचे मत व्यक्त केले.

महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, या स्मारकासाठी कार्यकर्त्यांनी तब्बल १५ वर्षे संघर्ष केला असून अखेर २७ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत आहे. रमाईंच्या जीवनातील संघर्ष आणि त्याग नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात सुप्रसिद्ध लोकगायक आनंद शिंदे यांच्या गीतगायनाने वातावरण भारावून गेले. बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करणाऱ्या गीतांना उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. या कार्यक्रमातून रमाईंच्या त्यागाचे स्मरण करत सामाजिक न्याय, समानता आणि परिवर्तनाच्या विचारांना पुन्हा अधोरेखित करण्यात आले.

> "बाबासाहेबांचा विचार म्हणजे अन्यायाविरुद्धचा अखंड संघर्ष आहे. रमाईंच्या त्यागामुळेच हा संघर्ष यशाच्या शिखरावर पोहोचला आणि आजचा समाज आत्मविश्वासाने उभा आहे."
>
> - रामदास आठवले, केंद्रीय मंत्री.

> "समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही केवळ कल्पना नसून ती समाजपरिवर्तनाची खरी पायाभरणी आहे. शिक्षणाशिवाय स्वाभिमान आणि न्याय यांची जाणीव होऊ शकत नाही."
>
> - डॉ. भीमराव आंबेडकर, डॉ. बाबासाहेबांचे नातू.

# निगडीतील हाय टेन्शन टॉवरवर चढलेल्या इसमाचा थरारक बचाव!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**निगडीतील चिकन चौक, यमुना नगर परिसरात सोमवारी रात्री अति उच्चदाब वीजवाहिनीच्या टॉवरवर एका इसमाने चढून धोकादायक परिस्थिती निर्माण केल्याची घटना घडली. रात्री सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.**

> "नागरिकांनी स्वतःच्या तसेच इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करू नये. हाय टेन्शन वीजवाहिन्या, टॉवर्स किंवा इतर धोकादायक ठिकाणी जाणे अत्यंत जीवघेणे ठरू शकते. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. कोणतीही संशयास्पद किंवा धोकादायक बाब आढळल्यास तात्काळ महानगरपालिका किंवा पोलिस प्रशासनाला कळवावे."
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.




> "अशा प्रकारच्या घटनांमध्ये बचावकार्य करताना अग्निशमन दलासमोर मोठे आव्हान उभे राहते. नागरिकांनी अशा धोकादायक कृती टाळून प्रशासनाला सहकार्य करणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः हाय टेन्शन टॉवर्स, उंच इमारती किंवा प्रतिबंधित ठिकाणी जाणे टाळावे. आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ माहिती दिल्यास जलद आणि प्रभावी मदत पोहोचवणे शक्य होते."
>
> - व्यंकटेश दुर्वास, उप आयुक्त, अग्निशमन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या प्राधिकरण उप अग्निशमन केंद्राचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पाहणीदरम्यान संबंधित इसम टॉवरच्या शिखरावर उभा राहून तारेवर कसरत करत असल्याचे दिसून आले,त्यामुळे मोठा जीवितहानीचा धोका निर्माण झाला होता.

उप आयुक्त तथा मुख्य अग्निशमन अधिकारी व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी तातडीने ५५ मीटर उंचीची ब्रांटो स्काय लिफ्ट मागवून बचावकार्य सुरू केले. रेस्क्यूदरम्यान संबंधित इसमाने टॉवरवरील अर्थिंग वायरचा जॉइंट खाली फेकण्याचा प्रयत्न केला; मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

अग्निशमन दलाच्या जवानांनी अत्यंत धाडस आणि कौशल्य दाखवत बचावकार्य केले. प्रारंभी चालक आणि यंत्रचालक दीपक ढवळे यांनी टॉवरखाली जंपिंग शीट व ताडपत्री लावून आवश्यक सुरक्षेची उपाययोजना केली. त्यानंतर लिडिंग फायरमन विकास नाईक यांनी टॉवरवर चढून इसमाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तर फायरमन सचिन ठोसरे यांनी त्यांना सहकार्य केले. यानंतर सह अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले आणि अनिल माने यांनीही टॉवरवर चढून परिस्थिती नियंत्रणात आणण्यास मदत केली. दुसऱ्या बाजूने ब्रांटो स्काय लिफ्टच्या सहाय्याने ऋषिकांत चिपाडे, अमोल चिपळूणकर आणि नाथा शिंदे यांनी बचावकार्य सुरू ठेवले. ब्रांटो ऑपरेशन अमोल चिपळूणकर आणि रुपेश जाधव यांनी यशस्वीरीत्या हाताळले.

अखेर अग्निशमन दलाच्या जवानांनी संबंधित इसमाला सुरक्षितपणे पकडून ब्रांटो केजमध्ये घेतले आणि सुखरूप खाली आणले. त्यानंतर त्याला पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या बचावकार्यात अग्निशमन दलासोबत पोलीस, महावितरण अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनीही मोलाचे सहकार्य केले.



## भूमिका

**‘जागतिक मराठी दिन’ किंवा ‘महाराष्ट्र दिन’ असे प्रसंग आले की राज्यकर्त्यांकडून भाषाभिमानाच्या नावाखाली काही निर्णय जाहीर होतात; परंतु त्यामागे वास्तवदर्शी विचार नसल्याने ते निर्णय हास्यास्पद ठरतात. रिक्षा-टॅक्सीचालकांस मराठी सक्ती आणि मुंबईतील ‘केईएम’ रुग्णालयाच्या नामांतराचा प्रस्ताव ही त्याची ताजी उदाहरणे होत.**

# गंडग्रस्तांचे गंडवणे!



रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी सक्ती करण्याचा निर्णय वरकरणी भाषाप्रेमाचा वाटतो; मात्र तो मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करणारा आहे. महाराष्ट्रात मराठी शाळा कमी होत आहेत, शिक्षणाचा दर्जा खालावत आहे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची अवस्था दयनीय आहे—या प्रश्नांवर उपाययोजना करण्याऐवजी दुर्बल घटकांवर बंधने घालणे हा सोपा मार्ग निवडला जातो. रस्त्यावर कष्ट करणाऱ्या चालकांवर मराठीची सक्ती लादणे म्हणजे भाषेचा प्रसार नव्हे, तर असहाय्यांवर अधिकार गाजवणे होय. मोठ्या उद्योगसंस्था, कॉर्पोरेट क्षेत्र किंवा उच्चभ्रू समाज यांच्याकडून मराठीच्या वापराची अपेक्षा ठेवण्याचे धैर्य मात्र दिसत नाही. याच धर्तीवर ‘केईएम’ रुग्णालयाचे नामांतर करण्याचा प्रस्तावही विचारशून्यतेचे प्रतीक आहे. ‘किंग एडवर्ड मेमोरियल’ हे नाव इंग्रजी असल्यामुळे बदलावे, असा यामागील युक्तिवाद आहे. परंतु नाव बदलल्याने इतिहास बदलत नाही. इंग्रजांच्या राज्यकाळातील अनेक गोष्टी वादग्रस्त असल्या तरी त्यांनी दिलेली काही संस्थात्मक रचना—कायद्याची चौकट, प्रशासन व्यवस्था—आजही उपयोगी आहे. त्यामुळे केवळ इंग्रजी नाव असल्यामुळे एखाद्या ऐतिहासिक संस्थेचे नामांतर करणे ही अपरिपक्व भूमिका ठरते. याउलट, खऱ्या अर्थाने भाषाभिमान म्हणजे भाषेचा वापर वाढवणे, शिक्षणात तिची गुणवत्ता उंचावणे आणि तिला आधुनिक ज्ञानाशी जोडणे होय. त्यासाठी दीर्घकालीन धोरण, संशोधन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. परंतु अशा प्रयत्नांना वेळ आणि अभ्यास लागतो; त्यामुळे तात्पुरते लोकप्रिय ठरणारे निर्णय घेतले जातात. नामांतर किंवा सक्ती यांमुळे भाषेचा विकास होत नाही, उलट समाजात दुरावा निर्माण होऊ शकतो.

राजकारणात प्रतीकात्मक कृतींना महत्त्व असते; पण त्या वास्तवाशी जोडलेल्या असल्या पाहिजेत. अन्यथा त्या केवळ दिखावा ठरतात. भाषेच्या नावाखाली घेतलेले असे निर्णय हे अनेकदा व्यक्तिगत किंवा राजकीय गंडाचे प्रतीक असतात. स्वतःची ओळख ठोस कामातून निर्माण करण्याऐवजी इतरांनी उभ्या केलेल्या गोष्टींवर आपलेपणा दाखवण्याचा हा प्रयत्न असतो. म्हणूनच राज्यकर्त्यांनी अशा निर्णयांपासून दूर राहून भाषाविकासासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. मराठीला बळकटी देण्यासाठी शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन आणि उद्योग या सर्व क्षेत्रांत तिचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अन्यथा ‘भाषाभिमान’ हा केवळ घोषणांपुरताच मर्यादित राहील आणि अशा गंडग्रस्त निर्णयांची मालिका सुरूच राहील.

## प्रासंगिक »

### कर्तृत्वाचा गर्व

**शिवराज हा कष्टाळू शेतकरी होता. आपल्या मेहनतीने त्याने मोठी शेती उभी केली होती. एकदा त्याने सहदेव महाराजांना आपल्या शेतावर बोलावले.**

त्यांची उत्तम व्यवस्था करून तो त्यांना शेत दाखवू लागला. चालता चालता तो अभिमानाने म्हणू लागला की, “ही सगळी शेती मी एकट्याने उभी केली आणि आजही मीच ती कौशल्याने सांभाळतो.”


महाराज शांतपणे ऐकत होते. थोड्या-वेळाने ते म्हणाले, “मला तुझी शेती नकाशावर दाखव.” घरी गेल्यावर शिवराजने नकाशा काढून सगळी जमीन दाखवली. तेव्हा महाराजांनी सुईच्या टोकाने नकाशावर एक बिंदू दाखवत सांगितले, “या विश्वात पृथ्वी इतकी छोटी, त्यात देश, राज्य, जिल्हा, गाव आणि त्यात तुझी ही शेती. आता सांग, यात तुझा किती मोठेपणा आहे?”

हे ऐकून शिवराजचा गर्व क्षणार्धात नाहीसा झाला. तो नम्र झाला.

- तात्पर्य : लोक अनेकदा खऱ्या गुणवत्तेपेक्षा देखाव्याला जास्त महत्त्व देतात.

**संपूर्ण भारत सध्या उष्णतेच्या तीव्र लाटेत होरपळत आहे. जगातील सर्वाधिक उष्ण शहरांमध्ये भारतातील शहरांची संख्या चिंताजनकरीत्या मोठी आहे. विदर्भासह अनेक भागांत ‘ऑरेंज’ आणि ‘यलो’ अलर्ट जारी करण्यात आले आहेत.**

# ‘सुपर एल निनो’ची चाहूल : इशाऱ्यांना प्रतिसाद देण्याची वेळ



हे केवळ ऋतूचक्रातील बदल नसून, मोठ्या हवामान संकटाची नांदी असल्याचे संकेत आहेत. जागतिक हवामान संघटनेने दिलेला ‘सुपर एल निनो’चा इशारा या पार्श्वभूमीवर अधिक गंभीर ठरतो. इतिहासाचा मागोवा घेतला, तर १८७६-७८ मधील ‘सुपर एल निनो’ने जगभरात अभूतपूर्व दुष्काळ निर्माण केला होता. भारतात लाखो लोकांचे बळी गेले, शेती उद्ध्वस्त झाली आणि सामाजिक-आर्थिक व्यवस्थेची घडी विस्कटली. त्या वेळी नैसर्गिक आपत्तीबरोबरच सत्ताधाऱ्यांची उदासीनता हीही मोठी कारणे ठरली. आज परिस्थिती बदलली असली, तरी धोक्याचे स्वरूप कायम आहे. फरक इतकाच की आज आपल्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध आहेत. सध्याच्या अहवालांनुसार, प्रशांत महासागरातील तापमानात झपाट्याने वाढ होत आहे आणि २०२६ मध्ये ‘एल निनो’ तीव्र स्वरूप धारण करू शकतो. भारतासाठी याचा थेट परिणाम म्हणजे मान्सूनवर आघात. आधीच पर्जन्यमान घटण्याचे संकेत मिळत आहेत. शेतीसाठी आवश्यक असलेल्या पावसात घट झाल्यास अन्नधान्य उत्पादन कमी होईल, महागाई वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला फटका बसेल. याशिवाय उष्णतेमुळे कामगारांची उत्पादकता घटून रोजगारावरही परिणाम होण्याची भीती आहे. मात्र, या संकटाकडे केवळ भीतीच्या नजरेतून पाहून चालणार नाही. योग्य नियोजन आणि तत्पर कृती केल्यास त्याचे परिणाम मर्यादित ठेवता येऊ शकतात. पाणी व्यवस्थापन, शेतीतील तंत्रज्ञानाचा वापर, हवामान-पूर्वसूचना प्रणाली अधिक सक्षम करणे आणि आपत्कालीन उपाययोजना मजबूत करणे, ही तातडीची पावले आहेत. त्याचबरोबर दीर्घकालीन उपाय म्हणून हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि पर्यावरणपूरक विकासाला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. हवामान बदल हा आता भविष्याचा नाही, तर वर्तमानाचा प्रश्न आहे. ‘सुपर एल निनो’चा इशारा हा केवळ वैज्ञानिक अंदाज नसून, कृतीची घंटा आहे. इतिहासाने दिलेला धडा लक्षात घेत, प्रशासन आणि समाजाने मिळून सजगपणे पावले उचलली, तर संभाव्य संकटाचा प्रभाव कमी करता येईल. अन्यथा, निसर्गाचा इशारा दुर्लक्षित केल्याची किंमत पुन्हा एकदा मोजावी लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# परभणीतील पुरातन वास्तूंसाठी आखणार कालबद्ध कार्यक्रम

## जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी एकत्रित विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश

**महाईन्यूज । परभणी**

**जिल्ह्यातील पुरातन मंदिरे व बारवा यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी एकत्रित विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले असून जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या समन्वयातून कालबद्ध कार्यक्रम आखला जाणार आहे. जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संयुक्त उपस्थितीत पार पडलेल्या मुंबईतील बैठकीतून काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.**



जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी येथील मंदिर परिसरामध्ये झालेली अतिक्रमणे हटवण्यात यावीत. या कामासाठी जर भूसंपादनाची आवश्यकता असेल, तर जिल्हा प्रशासनाने समन्वय साधून ही प्रक्रिया त्वरित राबवावी. हा संपूर्ण विकास प्रकल्प कालबद्ध कार्यक्रमांतर्गत पूर्ण करावा आणि यासाठी जिल्हा नियोजन समिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या निधीतून समन्वयाने आर्थिक तरतूद करावी, असेही सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

राज्याचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी शासन कटिबद्ध असून, या विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. सांस्कृतिक वारसा हा राज्याची ओळख असून त्याचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत या सर्व विकासकामांवर सातत्याने देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री ॲड. शेलार यांनी प्रशासनाला दिले.

जिल्ह्यात बारवांच्या संवर्धनाच्या मोहिमेने वेग घेतल्यानंतर अनेक बारवा उघडकीस आल्या. जिल्ह्यात अशा बारवांचे पुनरुज्जीवन करण्याचे अभियान लोकसहभागाच्या बळावर उत्स्फूर्तपणे झाले. जलव्यवस्थापनाचा हा पारंपरिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर असताना एका लोक चळवळीच्या माध्यमातून हा वारसा जपण्याचे प्रयत्न झाले. राणी सावरगाव (तालुका गंगाखेड) या ठिकाणी असलेली समृद्ध विहीर, मानवत येथील अमरेश्वर या प्राचीन शिवमंदिर परिसरात असलेली बारव, वालूर येथील वैशिष्ट्यपूर्ण बारव अशी सांस्कृतिक स्थळे या निमित्ताने चर्चेत आली आहेत.

जिल्ह्यातील चारठाणा हे गाव अशा अनेक स्थापत्यांचा समृद्ध वारसा असणारे आहे. चारठाणा येथे हेमाडपंती शिवमंदिर, गोकुळेश्वर, काशीविश्वेश्वर, श्री नृसिंहतीर्थ मंदिर, दगडी बांधकाम असलेली अष्टकोनी बारव, झुलता मनोरा ही महत्त्वाची स्थळे आहेत. यादव कालीन तेराव्या शतकातील हेमाडपंती बांधकाम असलेल्या या मंदिरात वर्षभर भाविकांची वर्दळ असते.सेलू तालुक्यातील वालूर या ठिकाणी असलेल्या बारवेतील गाळ आणि कचरा काढून टाकल्यानंतर त्याठिकाणी आता बारवेचे जे रूप दिसत आहे ते विलोभनीय आहे. पायऱ्यांची अनोखी घडण केवळ अप्रतिम अशी असून स्थापत्याचा तो एक अद्वितीय नमुना मानला जातो.

परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संयुक्त उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत जिल्ह्यातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.

### जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा

परभणी जिल्ह्याला संपन्न असा प्राचीन वारसा लाभलेला आहे. जिल्ह्यातील अप्रतिम स्थापत्यशैलीचा पुरावा असणारी हेमाडपंती मंदिरे, बारव नक्कीच बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या आहेत. काळ्याकभिन्न दगडात अनेक ठिकाणी पारंपरिक जलव्यवस्थापनाचा नमुना म्हणून बारव पाहायला मिळतात. हा सर्व सांस्कृतिक वारसा टिकला पाहिजे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत. असे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघना बोरडीकर यांनी सांगितले.

# हे 'सेल्फ रेडिकलायझेशन'चं प्रकरण,मिरा रोड हल्ल्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पष्टच बोलले

**महाईन्यूज । सोलापूर**

**मीरा रोड येथील नयानगर भागात रविवारी पहाटे एका माथेफिरूने दोन सुरक्षा रक्षकांवर चाकूने जीवघेणा हल्ला केला. जुबैर अंसारी असे आरोपीचे नाव आहे. त्याला अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्याने अगदी पहलगाम स्टाइल हल्ला केला. त्याने धर्माची विचारपूस करून कलमा वाचता येतो का? असा सवाल करत सुरक्षा रक्षकांवर चाकूहल्ला केला. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना, "हे सेल्फ रेडिकलायझेशनचे प्रकरण आहे.**





याला केवळ काही तरी आपल्याला जिहाद करायचा आहे आणि जिहाद करायचा म्हणजे, इतर धर्मियांना मारायचे, अशा विचारातून त्यांने हे कृत्य केले आहे. याच्या लिंकमध्ये कोण कोण आहेत? हे आता तपासातून पुढे येईल," असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते सोलापूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

"हे जे प्रकरण आहे हे बघितलं तर सेल्फ रेडिकलायझेशनचे प्रकरण आहे. मोठ्या प्रमाणात पुस्तकं, साहित्य, इंटरनेट या माध्यमातून रॅडिकलायझेशनचा (अतिरेकीपणा, कट्टरतावाद) जो प्रयत्न आहे, त्या प्रयत्नातून ही व्यक्ती, हा आरोपी तयार झालेला दिसत आहे. त्यामुळे याला केवळ काही तरी आपल्याला जिहाद करायचा आहे आणि जिहाद करायचा म्हणजे, इतर धर्मियांना मारायचे आहे, अशा पद्धतीच्या विचाराने पेटून त्यांने हे कृत्य केले आहे. त्याला पकडण्यात आले आहे. आता एटीएस आणि एनआयएची मदत घेऊन, या रॅडिकलायझेशनच्या पाठीमागे कोण कोण आहे? हेही शोधण्यात येईल. याचे कुटुंब परदेशात आहे, अमेरिकेत आहे. हाही अनेक वर्षे परदेशात राहिला आहे. यानंतर इथे आल्यानंतर, पहिल्यांना कुर्ल्यात आणि नंतर नयानगरमध्ये तो रहायला आला. आता याच्या लिंकमध्ये कोण कोण आहेत? अजून कोणी असे रॅडिकलाईज झाले आहेत का, या सगळ्या गोष्टी ज्या आहेत त्या आता तपासामध्ये पुढे येतील."

आरोपीकडे सापडलेल्या एका चिठ्ठीत 'LONE WOLVES WILL POUNCE ON YOU' आणि हिंदुस्थानातील खऱ्या जिहादची भाषा वापरण्यात आली आहे. तसेच यात गाझा आणि जिहाद या शब्दांचाही उल्लेख आहे. तपासानुसार, अंसारी सातत्याने इंटरनेटवर आयएसआयएससी संबंधित कट्टरपंथी व्हिडिओ पाहत असे. आरोपी उच्चशिक्षित असून त्याने २०१९ पर्यंत अमेरिकेत शिक्षण घेतले आहे. तो एका कोचिंग सेंटरमध्ये गणित आणि रसायनशास्त्र शिकवत असे. हा हल्ला पूर्व नियोजित होता की रागाच्या भरात केला गेला, याचा शोध घेतला जात आहे. आरोपीचा मोबाईल, ब्राउझिंग हिस्ट्री आणि तो कोणाच्या संपर्कात होता का, याची कसून चौकशी केली जात आहे. एकट्यानेच कट रचून हल्ला करण्याच्या पद्धतीला लोन वुल्फ अटॅकशी हा प्रकार मिळताजुळता असल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ४ च्या सुमारास मीरा रोड पूर्व येथील नया नगर भागात एका निर्माणाधीन इमारतीवर राजकुमार मिश्रा आणि सुब्रतो सेन हे दोन सुरक्षा रक्षक कर्तव्यावर होते. यावेळी आरोपी जुबैर तिथे आला. त्याने दोन्ही रक्षकांना त्यांची नावे आणि धर्म विचारला. त्यानंतर त्याने त्यांना कलमा वाचता येतो का? अशी विचारणा केली. सुरक्षा रक्षकांनी नाही, असे म्हणताच, जुबेरने त्यांच्यावर चाकूहल्ला केला. या हल्ल्यात राजकुमार मिश्रा यांच्या आतड्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुब्रतो सेन यांनी सुरक्षा केबिनमध्ये लपून आपला जीव वाचवला आणि पोलिसांना माहिती दिली.

# पश्चिम बंगाल निवडणुकीत काँग्रेस 'किंगमेकर'?

## पश्चिम बंगाल निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ५४ जागांवर काँग्रेसची भूमिका कळीची

महाईन्यूज | कोलकाता

**पश्चिम बंगालमध्ये २९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील भागासाठी २३ एप्रिल रोजी मतदान झाले होते. आता औद्योगिक पट्ट्यांचे प्रमाण व लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या पश्चिम बंगालच्या दक्षिणेकडील भागात मतदान पार पडणार आहे. तृणमूल काँग्रेस व भारतीय जनता पक्षात मुख्य लढत होत आहे.**



२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डावे पक्ष व काँग्रेसची चांगलीच पीछेहाट झाली. परंतु, या पक्षांनी घेतलेल्या मतांनी मात्र महत्वाची भूमिका बजावली होती.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, २०२१ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, लेफ्ट फ्रंट आणि इंडियन सेक्युलर फ्रंट (आयएसएफ) यांच्या संयुक्त मोर्चाला फक्त एक जागा जिंकता आली होती. तरीही ११७ मतदारसंघांमध्ये त्यांच्या मतांचा टक्का विजयाच्या फरकापेक्षा अधिक होता. ही संख्या २९४ सदस्यांच्या विधानसभेच्या एकूण जागांपैकी जवळपास ४० टक्के आहे. ११७ जागांपैकी ७४ जागांवर तृणमूल काँग्रेसचा विजय झाला, तर ४३ जागांवर भाजपला यश मिळाले होते. डावी आघाडी व काँग्रेस या पक्षांनी तृणमूल काँग्रेसच्या विरोधातील मतांचे विभाजन केले होते. 'संयुक्त मोर्चा'तील आयएसएफ पक्षाने एकमेव जागा जिंकली होती. तर डावे पक्ष आणि काँग्रेस यांना भोपळाही फोडता आला नव्हता.

दरम्यान, आयएसएफ पक्षाची मते वगळली तर डावे पक्ष आणि काँग्रेसची मते १०८ मतदारसंघांतील विजयाच्या फरकापेक्षा जास्त होती. थोडक्यात सांगायचे तर जी आघाडी निवडणुकीच्या दृष्टीने नगण्य वाटत होती, ती गणिताच्या दृष्टीने मात्र महत्वाची ठरली. तृणमूल काँग्रेसने डावे पक्ष व काँग्रेसच्या कामगिरीकडे यावेळी बारकाईने लक्ष ठेवले आहे. "काँग्रेस व डाव्या पक्षांनी चांगली कामगिरी करावी अशी आमची अपेक्षा आहे. कारण त्याने आम्हाला फायदा होणार आहे", असे तृणमूल काँग्रेसच्या एका नेत्याने 'द इंडियन एक्स्प्रेस'ला सांगितले.

संयुक्त मोर्चाच्या मतांचा टक्का विजयाच्या फरकापेक्षा अधिक असलेल्या ११७ मतदारसंघांपैकी ५४ जागांवर दुसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. यामध्ये दक्षिण बंगालचा औद्योगिक पट्टा समाविष्ट असून यात कोलकाता, हावडा, हुगळी, उत्तर आणि दक्षिण २४ परगणा आणि बर्धमान व मेदिनीपूरच्या काही भागांचा समावेश आहे. हे भौगोलिक क्षेत्र महत्त्वाचे आहे. पहिल्या टप्प्यात उत्तर बंगाल, जंगलमहल आणि सीमावर्ती जिल्ह्यांत मतदान पार पडले होते, तिथे ध्रुवीकरणाचे राजकारण मोठ्या प्रमाणात झाले होते. त्याउलट, दुसऱ्या टप्प्यात निवडणूक दाट वस्ती असलेल्या शहरांमध्ये आणि औद्योगिक पट्ट्यांमध्ये होणार आहे.

### डाव्यांची स्थिती काय?

"डाव्यांच्या रॅलींमध्ये लोकांचा प्रचंड सहभाग आहे. लाल झेंड्यांची लाट दिसत आहे. त्यावरून लोकांची भूमिका स्पष्ट होते. पंचायत निवडणुकीत डाव्यांनी भाजपपेक्षा चांगली कामगिरी केली होती. यावेळीही लोकांचा कल तसाच आहे. लोक डाव्यांसोबत जाण्यास उत्सुक आहेत", असे ते म्हणाले. तृणमूल आणि भाजपमधील द्विपक्षीय लढत अजूनही मतदारांच्या मानसिकतेवर वरचढ आहे आणि काही ठराविक नागरी व औद्योगिक पट्टे वगळता, डाव्यांची झालेली संघटनात्मक पडझड अजूनही भरून निघालेली नाही.

# गुजरातमध्ये BJPचा डंका! १५ महानगरपालिकांवर कमळ फुलले

महाईन्यूज | गुजरात

**गुजरातमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाने जोरदार बाजी मारली आहे. सर्व १५ महानगरपालिकांवर कमळ फुलले असून, विरोधक काँग्रेस आणि आम आदमी पक्षाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. गुजरातमध्ये २६ एप्रिल रोजी १५ महानगरपालिका, ८४ नगरपालिका, ३४ जिल्हापंचायती आणि २६० तालुका पंचायतींसाठी मतदान पार पडले.**



पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वात मोठ्या निवडणूक प्रक्रियेपैकी एक मानल्या जाणाऱ्या या निवडणुकांमध्ये, सुमारे ९,२०० जागांवर ४१.८ दशलक्षाहून अधिक पात्र मतदार सहभागी झाले होते.

अहमदाबाद महानगरपालिकेत भाजपने प्रचंड विजय मिळवला आहे. १९२ पैकी १५८ जागा जिंकून पक्षाने गुजरातच्या या सर्वात मोठ्या शहरात आपले वर्चस्व आणखी मजबूत केले आहे. या विजयाचे प्रमाण शहरी स्तरावर सत्ताधारी पक्षाला मिळालेला निर्णायक जनादेश दर्शवते. सुरत महानगरपालिकेत भाजपाने १२७ पैकी ११५ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला आहे. आम आदमी पक्षाला (आप) केवळ चार जागा जिंकता आल्या, तर काँग्रेसने एक जागा जिंकून पाच वर्षांनंतर आपले खाते उघडले. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही भाजप एक प्रमुख पक्ष म्हणून उदयास आला.

दरम्यान, सुरेंद्रनगर येथे ५२ पैकी ५१ ठिकाणी भाजपा विजयी झाली असून, काँग्रेसला १ जागा मिळाली आहे. ५२ जागांच्या वापी महानगरपालिकेत भाजपाने ३७ जागा जिंकल्या, तर ११ जागा काँग्रेसला मिळाल्या. मोरबी येथे सर्व ५२ जागा भाजपाने जिंकल्या आहेत.

गुजरात महानगरपालिकांच्या समोर आलेल्या निकालांनुसार, अहमदाबाद महानगरपालिकेत, भारतीय जनता पक्षाने १९२ पैकी १५८ जागा जिंकून पालिकेवर मजबूत पकड असल्याचे दाखवून दिले आहे. इथं काँग्रेसला केवळ २२ जागांवर विजय मिळवता आला. राजकोट महानगरपालिकेच्या भाजपाने ७२ पैकी ६५ जागा जिंकल्या, तर काँग्रेसला केवळ सात जागांवर समाधान मानावे लागले. इथे आम आदमी पक्षाला खातेही उघडता आले नाही. तसेच, राजकोट जिल्हा पंचायतच्या ३६ पैकी ३४ जागा जिंकून भाजपाने विरोधकांना पराभवाची धूळ चारली आहे.

गुजरातमध्ये तालुका स्तरावरही भाजपाचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले. पंचायत समितींच्या निवडणुकीत भाजपाने मोठा विजय मिळवला आहे. धोराजी, जेटपूर, गोंडल, कोटडा संगानी, लोधिका, पढारी, जसदान, विंचिया आणि जमकंदोरणा यांसह बहुतांश पंचायतींमध्ये भाजपा विजयी झाले आहे. भाजपने ११ पैकी १० तालुका पंचायती जिंकल्या आहेत.

### ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही भाजप

१,०९० जागा असलेल्या ३४ जिल्हा पंचायतींमध्ये पक्षाने ५६८ जागा जिंकल्या, तर काँग्रेसने ७७ आणि इतरांनी ३० जागा जिंकल्या. ५,२३४ जागा असलेल्या २६० तालुका पंचायतींमध्ये भाजपाने २,३९७, काँग्रेसने ५९१ आणि इतरांनी ३२९ जागा मिळवल्या. राजकोट महानगरपालिकेच्या सर्व १८ प्रभागांमधील मतमोजणी पूर्ण झाली असून, भारतीय जनता पक्षाने निर्णायक विजय मिळवला आहे. पक्षाने ७२ पैकी ६५ जागा जिंकल्याने, महानगरपालिकेत विरोधी पक्षाला फारच कमी वाव उरला आहे.

# जन नायकन'ची रिलीज लांबली



दक्षिण भारतीय सुपरस्टार विजय यांचा बहुप्रतीक्षित 'जन नायकन' हा चित्रपट सध्या मोठ्या चर्चेत आहे. या चित्रपटाच्या रिलीजबाबत मोठे अपडेट समोर आले आहे. सुरुवातीला जानेवारी 2026 मध्ये रिलीज होणारा हा चित्रपट आता सेन्सॉर वादामुळे पुढे ढकलण्यात आला होता. आता ताज्या माहितीनुसार, तमिळनाडू विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर म्हणजेच 8 मेच्या आसपास हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. 'जन नायकन' हा एक पॉलिटिकल ॲक्शन ड्रामा चित्रपट आहे. या चित्रपटात विजय एका वेगळ्या आणि दमदार भूमिकेत दिसणार आहेत. विशेष म्हणजे, हा चित्रपट त्यांच्या करिअरमधील शेवटचा चित्रपट असू शकतो, अशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता आहे. या चित्रपटाची रिलीज लांबण्यामागे मुख्य कारण म्हणजे त्यातील राजकीय आशय. काही रिपोर्ट्सनुसार, सेन्सॉर बोर्डाने चित्रपटातील काही संवाद आणि दृश्यांवर आक्षेप घेतला होता. त्यामुळे चित्रपटाची रिलीज थांबवावी लागली. त्यातच निवडणुकीचा काळ असल्यामुळे कोणताही वाद टाळण्यासाठी निर्मात्यांनी चित्रपट प्रदर्शित करण्यास विलंब केला. आता निवडणुकीचे वातावरण शांत झाल्यानंतर चित्रपट प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. 4 मे रोजी निवडणुकीचे निकाल जाहीर होणार असून, त्यानंतर लगेचच चित्रपट 8 मेच्या आसपास रिलीज करण्याची योजना आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. तरीही इंडस्ट्रीमध्ये याची जोरदार चर्चा सुरू आहे. दरम्यान, 'जन नायकन' काही दिवसांपूर्वी ऑनलाइन लीक झाल्याचीही माहिती समोर आली होती. त्यामुळे चित्रपटाच्या कमाईवर परिणाम होईल का, याबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. मात्र, विजय यांच्या जबरदस्त स्टारडममुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली ओपनिंग घेईल, असा विश्वास तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. चित्रपटाच्या कथेबद्दल आधीपासूनच उत्सुकता आहे. त्यातील संवाद आणि राजकीय मुद्द्यांमुळे तो प्रेक्षकांना वेगळा अनुभव देईल, असे मानले जात आहे. त्यामुळे रिलीज पुढे ढकलली असली, तरी चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.



# स्प्लिट्सविला 16'ची प्रीत सिंग मारहाणीची शिकार

स्प्लिट्सविला 16 या रिॲलिटी शोमधून प्रसिद्ध झालेली स्पर्धक प्रीत सिंग हिच्यासोबत मुंबईत एक धक्कादायक घटना घडली आहे. मुंबईतील एका क्लबमध्ये तिच्यावर हल्ला करण्यात आला. या मारहाणीमध्ये तिचा एक दात तुटला असून डोळे आणि चेहऱ्यावर सूज आली आहे. या घटनेनंतर प्रीतने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत आपली व्यथा मांडली आहे. प्रीत सिंगने (Preet Singh ) तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर व्हिडिओ पोस्ट केला. या व्हिडिओमध्ये तिच्या चेहऱ्यावरच्या जखमा स्पष्ट दिसत आहेत. तिचे डोळे सूजलेले असून ती खूप घाबरलेली आणि हादरलेली दिसते. व्हिडिओसोबत तिने लिहिले की, "मी नेहमी ऐकले होते की मुंबई हे महिलांसाठी सुरक्षित शहर आहे. पण माझ्यासोबत जे घडले, ते खूप भयानक आहे. हे लिहितानाही माझे हात थरथरत आहेत." तिने पुढे संपूर्ण घटनेबद्दल सांगितले की, ती तिच्या एका मित्रासोबत क्लबमध्ये शांतपणे बसली होती. त्यावेळी अचानक एक मुलगी त्यांच्यावर ओरडू लागली आणि त्यांना क्लबमध्ये कसे प्रवेश मिळाला, असा प्रश्न विचारू लागली. सुरुवातीला फक्त वाद झाला, पण काही वेळातच परिस्थिती बिघडली. त्या मुलीच्या एका मित्राने मध्ये येत प्रीत आणि तिच्या मित्रावर हल्ला केला.

# सीतेच्या भूमिकेसाठी साई पल्लवी योग्य की अयोग्य?



दक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी (Sai Pallavi) सध्या तिच्या आगामी 'रामायण' चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. या चित्रपटात ती सीतेची भूमिका साकारत आहे. मात्र, नुकत्याच एका व्हायरल व्हिडिओमुळे तिच्या कास्टिंगवर सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. अलीकडेच 'एक दिन' या चित्रपटाच्या कार्यक्रमात साई पल्लवी उपस्थित होती. या कार्यक्रमात तिने चाहत्यांशी हिंदी भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिची हिंदी थोडी अडखळणारी आणि तुटक वाटल्याने काही सोशल मीडिया यूजर्सनी तिच्यावर टीका केली. काहींनी तर प्रश्न उपस्थित केला की, "जिला नीट हिंदी बोलता येत नाही, ती सीतेसारखी महत्त्वाची भूमिका कशी निभावणार? या व्हिडिओनंतर इंटरनेटवर दोन गट तयार झाले. एक गट साई पल्लवीच्या विरोधात बोलत आहे, तर दुसरा गट तिच्या समर्थनात उभा आहे. टीका करणाऱ्या यूजर्सचे म्हणणे आहे की, इतक्या मोठ्या बजेटच्या चित्रपटात कलाकार निवडताना भाषा आणि संवाद कौशल्य महत्त्वाचे असते. काहींनी तर तिच्या हिंदीतील चुका दाखवत तिच्या अभिनय क्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मात्र, अनेक चाहत्यांनी साई पल्लवीचे समर्थनही केले आहे. काहींचे म्हणणे आहे की, चित्रपटांमध्ये डबिंगचा वापर केला जातो, त्यामुळे भाषा ही मोठी अडचण ठरत नाही. तसेच हा चित्रपट विविध भाषांमध्ये प्रदर्शित होणार असल्याने तिच्या आवाजावर नंतर काम केले जाईल. एका यूजरने असेही म्हटले की, "रामायण ही कथा भाषेच्या पलीकडे आहे. कलाकाराची भूमिका समजून घेण्याची क्षमता महत्त्वाची असते, भाषा नव्हे." याशिवाय, काही लोकांनी साई पल्लवीच्या साधेपणाचे आणि तिच्या निवडक भूमिकांचे कौतुक केले आहे. त्यांनी म्हटले की, साई पल्लवीने तिच्या करिअरमध्ये नेहमीच सोज्वळ आणि अर्थपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. त्यामुळे ती सीतेसारख्या पवित्र आणि आदर्श पात्रासाठी योग्य निवड आहे. दरम्यान, 'रामायण' हा मोठ्या बजेटचा आणि महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन नितेश तिवारी करत आहेत. चित्रपटात रणबीर कपूर रामाची भूमिका साकारणार आहेत, तर यश रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. याशिवाय रवि दुबे, सनी देओल आणि रकुल प्रीत सिंह यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार आहे. पहिला भाग 2026 च्या दिवाळीत, तर दुसरा भाग 2027 च्या दिवाळीत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. सध्या मात्र साई पल्लवीच्या कास्टिंगवरून सुरू झालेली ही चर्चा सोशल मीडियावर जोर धरत आहे. अखेर, प्रेक्षकांचा अंतिम निर्णय चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

# हिटमॅनचा मस्ती मोड ऑन!

## जिममध्ये रोहितने शार्दुलची घेतली फिरकी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल २०२६ स्पर्धेत मुंबई इंडियन्सचा सुपर फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखाली खेळत असलेला मुंबईचा संघ सध्या गुणतालिकेत नवव्या स्थानी आहे. मुंबई इंडियन्सचे आतापर्यंत ७ सामने झाले असून केवळ २ सामने जिंकता आले आहेत. तर ५ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. आता मुंबईचा पुढील सामना सनरायझर्स हैदराबादविरूद्ध आपल्या होम ग्राऊंड वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. या सामन्याआधी रोहित शर्माचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**



मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्मा फलंदाजीत हिट आहे. पण त्याला आपल्या फिटनेसमुळे ट्रोल केलं जायचं. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर त्याने आपल्या फिटनेसवर प्रचंड मेहनत घेतली आणि फिट झाला. आयपीएल २०२६ स्पर्धेत त्याला चांगली सुरूवात मिळाली होती. सुरूवातीला त्याने ऑरेंज कॅपवर कब्जा केला होता. पण त्यानंतर हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे त्याला काही सामने खेळता आलेले नाही.

दुखापतीमुळे बाहेर झालेला रोहित शर्मा सध्या आपल्या फिटनेसवर मेहनत घेत असून कमबॅक करण्याच्या प्रयत्नात आहे. फिटनेस आपल्या मैदानावरील कामगिरीसह रोहित आपल्या मजेशीर स्वभावासाठीही ओळखला जातो. सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तो शार्दुल ठाकूरसोबत जिममध्ये मस्ती करताना दिसून येत आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता की, शार्दुल ठाकूर जिममध्ये ट्रेनिंग करत आहे. त्यावेळी रोहित शर्मा त्याची फिरकी घेताना दिसून येत आहे. हा व्हिडीओ रोहितने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरुन शेअर केला आहे.




# थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धा : भारताची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गतविजेत्या भारतीय पुरुष संघाने थॉमस कप बॅडमिंटन स्पर्धेत दबदबा कायम राखत ऑस्ट्रेलियाचा ५-० असा एकतर्फी पराभव केला आणि या दणदणीत विजयासह स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. 'अ' गटात भारत आणि चीनने आपापले दोन्ही सुरुवातीचे सामने जिंकून अव्वल स्थान पटकावले असून, आता बुधवारी होणाऱ्या भारत विरुद्ध चीन सामन्यात गटातील विजेता कोण, याचा फैसला होईल.**

सामन्याची सुरुवात स्टार शटलर आणि राष्ट्रकुल विजेता लक्ष्य सेनने धडाक्यात केली. त्याने इफ्राईम स्टीफन सॅमचा २१-१४, २१-१६ असा सरळ सेटमध्ये पराभव करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर, आशियाई चॅम्पियनशिपचा उपविजेता आयुष शेट्टीने श्रेय धंडचा २१-८, २१-६ असा धुव्वा उडवत भारताची आघाडी दुप्पट केली.

दुहेरीच्या लढतीत आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने रिझकी हिदायत आणि जॅक यू जोडीचा २१-१४, २१-१६ असा पराभव केला. या विजयासह भारताने सामन्यात ३-० अशी विजयी आघाडी घेत उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले.

### प्रणॉय आणि दुहेरी जोडीची निर्भेळ कामगिरी

अनुभवी एच. एस. प्रणॉयने ऋषी होंडा भूपतीवर २१-११, २१-१७ अशी मात करत भारताला ४-० वर नेले. अखेरच्या दुहेरी सामन्यात हरिहरन अमसकरुनन आणि एम. आर. अर्जुन या जोडीने अँडिका रामादियन्स आणि इफ्राईम सॅम जोडीचा २१-१२, २१-१० असा पराभव करून भारताच्या ५-० अशा 'क्लीन स्वीप'वर शिक्कामोर्तब केले.



स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
दि. 29 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महापालिका शाळांमध्ये प्रोजेक्ट एक्झिबिशनची गरज : बारणे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग' (प्रकल्प आधारित शिक्षण) ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केले.**

> "महापालिका शाळांमधील ही बदलती आणि आधुनिक शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरणारी आहे. अशा प्रकारचे उपक्रम विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला चालना देतात. त्यामुळे आगामी काळात हे 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन' केवळ एका शाळेपुरते मर्यादित न ठेवता, संपूर्ण शहर पातळीवर आयोजित करण्यासाठी प्रशासन स्तरावर नक्कीच प्रयत्नशील राहू." - **अभिषेक बारणे,**
> **स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

काळेवाडी येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळेच्या वतीने 'प्रोजेक्ट बेस्ड एक्झिबिशन'चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य रितू पचारिया आणि विद्यार्थ्यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, भाजपा मंडल अध्यक्ष सनी बारणे, शाळेचे शिक्षक, आकांक्षा फाउंडेशनचे प्रतिनिधी, पालक आणि निमंत्रित सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. थेरगाव येथील शाळेच्या सेकंडरी कॅम्पसमध्ये हे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विज्ञान, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणीव या विषयांवर आधारित अत्यंत कल्पक आणि वैविध्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, ते प्रयोगांच्या माध्यमातून कसे मांडता येईल, याचे उत्तम सादरीकरण या प्रदर्शनातून केले. यावेळी सभापती अभिषेक बारणे यांनी प्रत्येक प्रकल्पाची बारकाईने पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभिषेक बारणे म्हणाले की, "पुस्तकी ज्ञानासोबतच प्रकल्पांच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खऱ्या अर्थाने वाढवते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून महापालिका शाळांच्या गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस उंचावणारा आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पांचे आणि शाळेच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.





# पर्यटननगरी लोणावळ्यातील पार्किंगची समस्या सुटणार!

## रेल्वे प्रशासन वाहनतळ विकसित करणार : खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**महाईन्यूज** I पिंपरी- चिंचवड

**मावळ लोकसभा मतदारसंघातील पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केली. त्यावर तत्काळ जागेची पाहणी करुन वाहनतळ विकसित करण्याची ग्वाही रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली.**

मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वेची चालू, प्रलंबित, प्रस्तावित कामांसदर्भात खासदार बारणे यांनी रेल्वेचे महाप्रबंधक हिरेशजी मीना यांच्याबरोबर आढावा बैठक घेतली. आमदार सुनील शेळके, अपर मंडल रेल प्रबंधक निरज यादव, मंडल वाणिज्य प्रबंध मानस पुरे, लोणावळा नगरपरिषदचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, शिवसेना शहर प्रमुख संजय भोईर, कर्जत प्रवासी संघटनेचे अध्यक्ष पंकज ओसवाल, लोणावळा नगरपरिषदचे नगरसेवक बैठकीला उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, पर्यटनगरी असलेल्या लोणावळ्यात रेल्वे प्रवाशांना वाहने लावण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. रेल्वे स्टेशन लगत जागा उपलब्ध आहे. या जागेची पाहणी करुन तेथे वाहनतळ विकसित करावे. त्यामुळे पर्यटकांना पार्किंग उपलब्ध होईल. रेल्वे अधिकाऱ्यांसाठी असलेल्या निवासस्थान परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करावी. लोणावळ्यात रेल्वे अंतर्गत असलेल्या २५ एकर जागेत रेल्वे म्युझिम करावे. ओव्हर ब्रीजच्या कामाला गती द्यावी. कुमार रिसॉर्टपासून रस्ता बाजारपेठेत जातो. या पुलाचे रुंदीकरण करावे. मैदान विकसित करावे.

मावळातील डोंगरगाव येथील ३४ नंबरचे रेल्वे गेट केवळ १२ तास सुरु असते. हे गेट २४ तास सुरु ठेवावे. नाणे येथील गेट नंबर ४३ सुरु ठेवावे. कामशेत येथे आंदर मावळकडे जाणाऱ्या रस्त्यावर ओव्हर ब्रीज उभारण्यात यावा. पनवेल तालुक्यातील सोमाटणेतील गेट नंबर ७५ येथे अंडर पास तयार करण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली.



### एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पुन्हा सुरु करा

मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्टेशनवर एक्सप्रेस गाड्यांचे थांबे होते. कोरोना काळात हे थांबे बंद केले. त्यानंतर पुन्हा सुरु केले नाहीत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकांवर कोयना एक्सप्रेस, हैद्राबाद, चेन्नई, गढक, सिद्धेश्वर, कोल्हापूर-अहमदाबाद, बंगळुरु-जोधपूर या एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना थांबे द्यावेत. पुणे-लोणावळा मार्गावरील दुपारी दीड वाजताची लोकल पुन्हा सुरु करावी, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

### स्थानिकांना भाडेतत्वार जागा उपलब्ध करून द्या

भुशी धरण परिसरात हंगामी स्वरूपाचा पर्यटन व्यवसाय करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी लावलेल्या दुकानांवर रेल्वे प्रशासनाकडूनअतिक्रमण कारवाई करण्यात आली. या परिसरामध्ये व्यवसाय करणारे स्थानिक नागरिक मागील ४० वर्षांपासून या ठिकाणी चहा, वडापाव, भजी विक्रीचा व्यवसाय करतात. केवळ व्यवसायच नाही तर भुशी धरणावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी देखील हेच व्यावसायिक घेत असतात. स्थानिक लोकांना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी चर्चेतून मार्ग काढावा. रेल्वेची सुरक्षा, स्थानिकांचे हित पाहून समन्वयातून चांगला प्रस्ताव आणावा. स्थानिकांना भाडेतत्वार जागा उपलब्ध करुन देण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली. यावर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली.

### पुणे ते लोणावळा चौथ्या ट्रॅकच्या कामाला गती द्या

पनवेल, नेरळ, कर्जत रेल्वे स्टेशनचा अमृत भारत योजनेअंतर्गत विकास करावा.पनवेल ते कर्जत रेल्वे मार्गाचे काम पूर्ण होत आले आहे. येथील जुन्या स्टेशनपासून नवीन कॉरिडॉरला जोडणारा मार्ग तयार करावा. प्रवाशांना सुविधा द्याव्यात. खंडाळ्यात तिकीट घर करावे. मुंबई-पुणे बंगळुरु, पुणे हैद्राबाद हाई स्पीड रेल्वे प्रकल्पाचा आराखडा तयार करावा. त्या कामाला गती द्यावी. पुणे ते लोणावळा चौथ्या ट्रॅकच्या कामाला गती द्यावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

# ध्रुव मर्दीकरची आंतरराष्ट्रीय स्पेलिंग बी स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाची कामगिरी

**महाईन्यूज** I पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवडमधील दहा वर्षीय ध्रुव मर्दीकर याने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत MARRS REDISCOVER आयोजित स्पेलिंग बी स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवला आहे. ही स्पर्धा २६ एप्रिल रोजी मुंबईतील जीसीसी इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडली.**

बालवाडी येथील VIBGYOR हाय स्कूलचा विद्यार्थी असलेल्या ध्रुवने कठीण आणि बहुपर्यायी फेऱ्यांतून उत्कृष्ट कामगिरी करत हे यश मिळवले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेवरील पकड विविध अंगांनी तपासण्यात आली. स्पेलिंग अचूकता, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, पार्ट्स ऑफ स्पीच, फोनिमिक स्क्रिप्ट ओळख तसेच श्रवण कौशल्ये या बाबींवर आधारित प्रश्नांमुळे स्पर्धेची पातळी उच्च होती.

देशभरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरली. लहान वयात ध्रुवने मिळवलेले हे यश त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचे द्योतक मानले जात आहे.

पुनावळे येथील पुणेव्हिले सोसायटीत राहणाऱ्या ध्रुवच्या यशाबद्दल त्याच्या कुटुंबीयांनी आणि शाळेने आनंद व्यक्त केला आहे. ध्रुवच्या पालकांनी सांगितले की, या यशामुळे त्याला पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळेल. ध्रुवच्या या यशामुळे VIBGYOR हाय स्कूल, बालवाडी तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील विद्यार्थी समुदायात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्टता साधण्याची प्रेरणा मिळत आहे.







> “ध्रुवने मिळवलेले हे यश आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. त्याने सातत्याने मेहनत घेतली आणि प्रत्येक टप्प्यावर लक्ष केंद्रित केले. या यशामुळे त्याला पुढे आणखी शिकण्याची आणि स्वतःला अधिक सक्षम बनवण्याची प्रेरणा मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे. आम्ही त्याच्या प्रयत्नांना नेहमीच पाठिंबा देत राहू.”
>
> - ध्रुव मर्दिकर याचे पालक.

# डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे भारतीय विद्यापीठ संघाची ऐतिहासिक सभा

## १९२५ मध्ये स्थापन झालेल्या AIU चे हे शताब्दी वर्ष असल्याने या सभेला विशेष महत्त्व

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**दि. २८ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या या परिषदेत देशभरातील विद्यापीठांचे कुलगुरू आणि शिक्षणतज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. १९२५ मध्ये स्थापन झालेल्या AIU चे हे शताब्दी वर्ष असल्याने या सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण परिषदेचे यजमानपद डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे भूषविणार आहे.**



या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सभागृहात संपन्न होईल. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल मा. श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या शुभहस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे."

या कार्यक्रमास मा. डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे, भारतीय विद्यापीठ संघाचे अध्यक्ष – मा. प्रा. विनय कुमार पाठक, सरचिटणीस आणि सदस्य सचिव – डॉ. सौ. पंकज मित्तल तसेच मा. डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि अध्यक्षा, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे, मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटी, पुणे, मा. डॉ. सौ. स्मिता जाधव, प्र-कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे, मा. डॉ. यशराज पी. पाटील, विश्वस्त आणि खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे तसेच मा. प्रा. डॉ. एन. जे. पवार, कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे, हे सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या शताब्दी महोत्सवी परिषदेचा मुख्य विषय "ज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताला आकार देणे" असा आहे.

या तीन दिवसीय परिषदेमध्ये देशभरातील ४०० हून कुलगुरू उपस्थित राहणार असून एकूण ३४ मान्यवर व्याख्याते विविध समकालीन विषयांवर सखोल विचारमंथन करणार आहेत. यामध्ये स्वदेशी आणि तंत्रज्ञान व आर्थिक राष्ट्रवाद, शाश्वतता व सामाजिक जबाबदारी, उद्योजकता व स्टार्टअप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्वांटम तंत्रज्ञान, विकसित भारत शिक्षा अधिष्ठान (VBSA) विधेयक, २०२५', उच्च शिक्षणात आंतरराष्ट्रीयीकरणाला चालना देणे तसेच भारतीय पारंपारिक ज्ञान या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे.

ही परिषद उच्च शिक्षणातील नवकल्पना, संशोधन, परस्पर सहकार्य आणि भविष्यातील धोरणनिर्मिती यांसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरणार असून, भारताच्या शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम, आधुनिक आणि प्रगत बनविण्यास महत्त्वपूर्ण योगदान देईल.

भारतीय विद्यापीठ संघाच्या (AIU) स्थापना दिन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या व्याख्यानाचा विषय 'ज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनातून आत्मनिर्भर भारताची घडण' – डॉ विनय सहस्रबुद्धे माजी खासदार, राज्यसभा आणि उपाध्यक्ष रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे मुख्य व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करतील. याच कार्यक्रमात भारतीय विद्यापीठ संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासावर आधारित 'असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज: अ सेंचुरी ऑफ इव्होल्यूशन ट्रान्सफॉर्मेशन अँड लीडरशिप' या पुस्तकाचे प्रकाशन केले जाईल.

या सोहळ्याच्या सांगता समारंभासाठी महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहतील, तर शिक्षण संस्कृती उत्थान न्यासाचे राष्ट्रीय सचिव मा. डॉ. अतुल कोठारी हे सन्माननीय अतिथी असतील.

"भारतीय विद्यापीठ संघाचे (AIU) शताब्दी वर्ष आमच्या विद्यापीठात साजरे केले जात आहे, याचा आम्हाला मनापासून आनंद होत आहे. शिक्षण क्षेत्रातील हा एक ऐतिहासिक टप्पा असून, या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे पूर्णक्षमतेने सज्ज आहे."

**— डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे**

"उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण बदल आणि संशोधनाचा जागर या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे. शताब्दी वर्षातील हे विचारमंथन उद्याच्या प्रगत भारताची पायाभरणी करेल. संशोधनासोबतच शैक्षणिक धोरणांमध्ये सर्वसमावेशक विद्याशाखांना सामावून घेणे हे या परिषदेचे उद्दिष्ट असेल."

**— डॉ. भाग्यश्रीताई पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.**

"कुलगुरूंच्या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून भारतीय पारंपरिक ज्ञानाचा पाया आणि आधुनिक तंत्रज्ञानाची भरारी; विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी स्टार्टअप्स आणि संशोधनाची नवी पायरी उभारली जात आहे".

**- मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटी, पुणे.**

" या 'विद्येच्या माहेरघरात' उच्च शिक्षणाच्या धोरणात्मक निर्णयांची नवी दिशा ठरणार आहे. उच्च शिक्षणातील डिजिटल परिवर्तन आणि जागतिक दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता (ACADEMIC QUALITY) यावर या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, जे पुढील दशकाची दिशा ठरवतील."

**— डॉ. स्मिता जाधव, प्र-कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.**

"राष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे व्यवस्थापन आणि सेवा सुविधांचे नियोजन आम्ही पूर्ण क्षमतेने केले आहे. वैचारिक आदान-प्रदानातून भविष्याची दिशा निश्चित करणाऱ्या या शैक्षणिक महाकुंभासाठी आम्ही सज्ज असून देशातील सर्व कुलगुरूंचे आणि शिक्षणतज्ज्ञांचे स्वागत करण्यास आम्ही उत्सुक आहोत."

**— डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, सोसायटी, पुणे.**

" या परिषदेमुळे पुण्याच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला जाणार असून, संपूर्ण देशाचे लक्ष या ऐतिहासिक सभेकडे लागले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी समन्वय आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शैक्षणिक भविष्यकालीन आव्हाने व संधी या विषयावर या परिषदेत सखोल चर्चा होईल, ज्याचा फायदा भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर होईल."

**— डॉ. एन. जे. पवार, कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.**

DPU
DR. D. Y. PATIL VIDYAPEETH, PUNE

# Governor Jishnu Dev Varma inaugurates AIU's 100th Annual Meet in Pune

**MahaENews | PIMPRI-CHINCHWAD**

**The Hon'ble Governor of Maharashtra, Jishnu Dev Varma, on Tuesday inaugurated the 100th Annual General Body Meeting and National Conference of the Association of Indian Universities at Dr. D. Y. Patil Vidyapeeth, Pimpri.**






The three-day centenary conference, themed "Shaping Self-Reliant Bharat Through Knowledge and Innovation," has brought together over 300 Vice Chancellors, academic leaders, and policymakers from across India.

The event opened with a traditional welcome extended to visiting dignitaries, reflecting the institution's emphasis on academic respect and Indian hospitality.

Focus on innovation, research and inclusive growth

Addressing the gathering, Governor Varma highlighted the critical role of innovation and research in India's journey towards becoming a developed nation by 2047.

"Universities must nurture critical thinking, problem-solving abilities, and a spirit of inquiry among students so that they become contributors to society," he said.

He also stressed that development must go beyond economic indicators and ensure benefits reach the last person in society.

Call for wider access to education

The Governor underlined the importance of school outreach initiatives, particularly for students from economically weaker sections, Scheduled Castes, and Scheduled Tribes, to improve access to higher education.

Academic leadership in attendance

The inaugural session was attended by Vinay Kumar Pathak, Pankaj Mittal, P. D. Patil, and N. J. Pawar, along with senior representatives from universities nationwide.

On the occasion, the Governor released a special issue of University News and two key publications marking the centenary milestone of AIU.

Education must build character: Chancellor

Speaking at the event, Chancellor P. D. Patil emphasised the broader purpose of education.

"True excellence lies not only in academic achievement, but also in character and integrity," he said.

He added that universities must balance traditional values with innovation and practical learning.

Legacy of reform inspires conference

The conference also drew inspiration from Maharashtra's educational and social reform legacy, with references to Shivaji Maharaj, Sambhaji Maharaj, Savitribai Phule, and Jyotiba Phule.

A major highlight of the conference is the idea of "AI-native universities," signalling a shift from information delivery to transformation-driven education focused on creativity and application. With wide participation and diverse discussions, the conference is expected to shape the future direction of higher education in India.

## Key Highlights

- 100TH ANNUAL MEET OF AIU HELD IN PUNE
- OVER 300 VICE CHANCELLORS PARTICIPATED
- THEME: SELF-RELIANT BHARAT THROUGH KNOWLEDGE & INNOVATION
- FOCUS ON AI, RESEARCH, SUSTAINABILITY AND ENTREPRENEURSHIP
- SPECIAL SESSIONS ON HEALTHCARE AND GLOBAL COLLABORATION

## Key Themes of Conference

- INTERNATIONALISATION OF HIGHER EDUCATION
- AI AND QUANTUM-ENABLED INSTITUTIONS
- SELF-RELIANCE AND ECONOMIC PATRIOTISM
- SUSTAINABILITY IN UNIVERSITIES
- INTEGRATION OF TRADITIONAL KNOWLEDGE SYSTEMS
- TOWARDS AI-NATIVE UNIVERSITIES

# Teachers Attend Gender Sensitivity Training at Priyadarshini School, Moshi

**MahaENews | PIMPRI-CHINCHWAD**

**Priyadarshini School, Moshi, recently organized an insightful training session for its teachers on the topic "Gender Sensitivity in School." The initiative aimed to promote awareness about equality and inclusivity within the classroom environment.**






The session was conducted by renowned experts Dr. Hitesh Sharma and Ms. Ashwini Pansare, who shared valuable insights into understanding gender roles and breaking long-standing stereotypes. They emphasized the importance of respectful communication, unbiased behavior, and the need to create a safe and supportive space for all students.

During the session, teachers were guided on how to identify unconscious biases and adopt gender-inclusive teaching practices. Interactive discussions and real-life examples made the training engaging, practical, and relatable for participants.

The program proved to be empowering for educators, equipping them with the tools to foster a more inclusive and supportive school culture. The school management appreciated the initiative and highlighted the importance of conducting such sessions regularly to build a progressive and equitable learning environment.